**पाणी पुरवठा योजनांतर्गत किमान १०% लोकसहभाग प्राप्त करुन घेण्याची पध्दत घालून देणे व योजनेचे प्राधान्य निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र. ग्रापापु-१००२/प्रक्र-५३२/-पापु-०७, मंत्रालय ४०० ०३२, दिनांक २३ मार्च, २००२.**

**वाचा :-**१) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु-१०९९/प्रक्र-३२८/ पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००.
२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापापु-१०००/प्रक्र-१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाने ग्रामीण पाणीपुरवठयाच्या धोरणामध्ये संदर्भीय दिनांक **२७ जुलै, २०००** व दिनांक **३ सप्टेंबर, २००१** च्या शासन निर्णयान्वये अमुलाग्र बदल करुन ग्रामीण पाणीपुरवठा योजना **मागणीआधारित, लोकसहभागावर** राबविण्याचे धोरण अंगिकारले आहे. परंतु या धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणींबाबत बऱ्याच जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करण्याची विंनती केली आहे. जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करुन त्यांना या संदर्भात मार्गदर्शन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार बाबींचा विचार करुन शासन पुढीलप्रमाणे सूचना देत आहे:-

१) जिल्हा परिषदांमध्ये सध्या जुन्या धोरणाप्रमाणे ज्या योजना सुरु आहेत त्यांची कामे पूर्ण करण्याकरिता शासनाचे हमीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उभारलेल्या कर्जरोख्यांतून , केंद्र पुरस्कृत वर्धित वेग ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमातून उपलब्ध होणाऱ्या रकमेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. नवीन लोकसहभागाचे धोरण अवलंबण्यापूर्वी किमान गरजा कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदांनी हाती घेतलेल्या प्रगतीपथावरील योजना पूर्ण करण्यासाठी हा निधी वापरावा. सर्व योजना मार्च, २००३ पूर्वी पूर्ण कराव्यात.

२) आर्युविमा महामंडळ (L.I.C.) नाबार्ड, हुडको व जिल्हा परिषदांना क्र.१ नुसार वितरीत केल्यावर रोख्यांमधील वा केंद्र पुरस्कृत वर्धित वेग ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमाखालील (ARWSP) उर्वरित निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील प्रगतीपथावरील योजनांसाठी प्राधान्यक्रमानुसार वापरावा.

३) सन २००२-२००३ या आर्थिक वर्षापासून जिल्हा परिषदांना अर्थसंकल्पातून किमान गरजा कार्यक्रमांतर्गत जो योजनांतर्गत निधी उपलब्ध होईल तो पूर्णपणे नवीन लोकसहभागाचे धोरणानुसार राबवावयाच्या योजनांसाठीच खर्च करण्यात यावा.



८०८

४) केंद्र शासनाच्या क्षेत्र सुधारणा योजनांतर्गत पथदर्शी जिल्हयांना उपलबध होणारा निधी, जर्मन शासनाच्या KFW खालील जिल्हयांना उपलब्ध होणारा निधी व जागतिक बँकेचा प्रकल्प मंजूर झाल्यावर उपलब्ध होणारा निधी त्या त्या कार्यक्रमाखाली मंजूर झालेल्या योजनांसाठीच संबंधित प्रकल्पाच्या निकषानुसार वापरावा.

५) सुधारित लोकसहभागाच्या धोरणांतर्गत उपलब्ध निधीपैकी किमान २५% निधी योजना **पुनरुज्जीवन/ स्त्रोत बळकटीकरण** इ. कामांसाठी व उर्वरित निधी नवीन पाणीपुरवठा योजनांसाठी लोकांच्या मागणीनुसार खर्च करण्यात यावा. जसजशी नवीन योजनांसाठीची मागणी कमी होत जाईल तसतसा नवीन योजनांसाठीचा राखीव निधीसुध्दा कालांतराने योजना पुनरुज्जीवन व स्त्रोत बळकटीकरणासाठी पूर्णपणे खर्च करण्यात यावा. मात्र या निधीतून देखभाल दुरुस्तीच्या स्वरुपाचे कोणतेही काम घेता येणार नाही. देखभाल दुरुस्तीचा संपूर्ण खर्च योजनेच्या लाभधारकांकडून पाणीपट्टी वसूल करुन करावयाचा आहे.

६) दरवर्षी जिल्हयात घ्यावयाच्या पाणीपुरवठा योजनांचा **प्राधान्यक्रम** ठरविण्यासाठी, दरवर्षी लगतपूर्वीच्या वर्षाच्या पुढील आर्थिक वर्षात **जानेवारी महिन्यात** चालू योजना व संभाव्य उपलब्ध निधीचा विचार करुन जिल्हयातील सर्वात जास्त खपाच्या वर्तमानपत्रातून, केबलवरुन व इतर प्रसार माध्यमातून जिल्हा परिषदांमार्फत जाहिरात देण्यात यावी की, ज्या ग्रामपंचायतींना/ गावांना पिण्याच्या पाण्याच्या नवीन योजनांसाठी अथवा अस्तित्वात असलेल्या योजनांच्या पुनरुज्जीवनासाठी किंवा स्त्रोत बळकटीकरणासाठी शासकीय निधीची आवश्यकता असेल त्यांनी, संदर्भिय क्रमांक २ येथे नमूद केलेल्या दिनांक ३ सप्टेंबर २००१ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामसभेत ठराव करुन जिल्हा परिषदेकडे विहीत मुदतीत अर्जे करावा अशा प्रकारचा अर्ज करण्यासाठी साधारणतः दोन महिन्यांची मुदत दयावी.

७) जर दोन किंवा त्यापेक्षा अधिक गावे/ ग्रामपंचायती एकत्र येऊन त्या गावांची/ ग्रामपंचायतींची एकत्रित योजना करण्यास तयार असतील तर सर्व ग्रामपंचायतींच्या वेगवेगळया सभा घेऊन त्यांनी निवडलेल्या ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीच्या अध्यक्षांच्या सहीने व सर्व ग्रामपंचायतींच्या सरपंचांच्या मान्यतेने त्यांनी संयुक्त अर्ज करावा व योजना एकत्र राबविण्याची तयार आहे असे सहमती पत्र त्यांच्याकडून घेण्यात यावे.

८) वरील क्रमांक ६ मध्ये नमूद मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची एकत्रित तपासणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करुन खालील ठरविलेल्या **निकषानुसार** त्यांनी **प्राधान्य यादी** तयार करावी.



४७८

| अ.क्र | निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दत | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| १ | लाभधारकांना होणारे पाणी-पुरवठयाचे सध्याचे प्रमाण | २५ गुण | i) गावात शासकीय पाणीपुरवठा योजना नाही अथवा पूर्णपणे बंद असून सुरु करता येण्यापलिकडे आहे.<br>ii) गावात शासकीय पाणीपुरवठा योजना आहे, परंतु त्यातून मिळणारा पाणी पुरवठाः-<br>अ) ०-१० लीटर<br>ब) ११-२० लीटर<br>क) २१-३० लीटर<br>ड) ३१-४० लीटरपेक्षा कमी<br>इ) ४० लीटर व त्याचे वर | २५गुण<br><br><br><br><br><br><br>२० गुण<br>१५ गुण<br>१० गुण<br>०५ गुण<br>०० गुण |
| २ | पाणी प्रत<br>अ) नैसर्गिक<br><br><br><br><br><br><br><br>ब) मानवनिर्मित औद्योगिक किंवा शहरी सांडपाण्यामुळे पाण्याची प्रत बिघडणे (यामध्ये गावाचा प्रत्यक्ष दोष नाही अशा कारणांचा अंतर्भाव होईल). | २५ गुण | **नैसर्गिक**<br>i) फ्लोराईड, आर्सेनिक यांनी बाधित स्त्रोत<br>ii) नायट्रेट किंवा मचुळपणाने बाधित स्त्रोत<br>iii) लोह<br>iv) इतर हानिकारक खनिज किंवा आरोगयास धोकादायक बाबी.<br>**मानवनिर्मित**<br>v) गावालगतच्या स्त्रोतात प्रयोगशाळेच्या पृथःकरणानुसार प्रदूषण विहित प्रमाणाबाहेर असल्यास व स्त्रोत पिण्यासाठी वापरणे शक्य नसल्यास व त्यामुळे दुरुन पाणी आणावे लागत असल्यास. | <br>२५ गुण<br><br>२० गुण<br>१५ गुण<br>१० गुण<br><br>०५ गुण |
| ३ | योजनेच्या कार्यक्षेत्रातील गावातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे प्रमाण (%) | १० गुण | i) जिल्हा सरासरी एवढी टक्केवारी<br>ii) जिल्हा सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण. मात्र कमाल गुण मर्यादा जिल्हा सरासरीपेक्षा ५% किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास कमाल १० गुणांवर सिमित करावे.<br>iii) जिल्हा सरासरीपेक्षा कमी | ०५ गुण<br><br>०६ ते कमाल १० पर्यंत गुण |



'८५१

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | टक्क्वारी असल्यास प्रत्येक पूर्ण १% कमी सरासरीसाठी १ गुण कमी करण्यात यावा. जिल्हा सरासरीपेक्षा ५ किंवा त्यापेक्षा जादाने टक्केवारी कमी असल्यास ० गुण देण्यात यावे. | ०४ ते ०० पर्यंत गुण |
| ४ | मागासवर्गीयांचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी) | १० गुण | i) राज्य सरासरी एवढी टक्केवारी<br><br>ii) राज्य सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण. मात्र कमाल गुण मर्यादा (५% किंवा जास्त टक्केवारी असल्यास) १० गुणांवर सिमित करावे.<br><br>iii) राज्य सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास प्रत्येकी १% कमी सरासरीसाठी १ गुण कमी करण्यात यावा. ५ किंवा त्यापेक्षा जादाने कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | ०५ गुण<br><br>०६ ते कमाल १० पर्यंत गुण<br><br>०४ ते ०० पर्यंत गुण |
| ५ | आदिवासींचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी) | १० गुण | i) राज्य सरासरी एवढी टक्केवारी<br><br>ii) राज्य सरीसरीपेक्षा जादा. टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण मात्र कमाल गुण मर्यादा (५% किंवा जास्त असल्यास) १० गुणांवर सिमित करावे.<br><br>iii) राज्य सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास प्रत्येकी १% कमी सरासरीसाठी १ गुण कमी करण्यात यावा. ५ किंवा त्यापेक्षा जादाने कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | ०५ गुण<br><br>०६ ते कमाल १० पर्यंत गुण<br><br>०४ ते ०० पर्यंत गुण |
| ६ | गावातील पूर्वीची पाणीपट्टी वसुली. | ५ गुण | i) ९० ते १००% वसुली<br>ii) ७५ ते ८९% वसुली<br>iii) ६० ते ७४% वसुली<br>iv) ५० ते ६९% वसुली | ०५ गुण<br>०४ गुण<br>०३ गुण<br>०२ गुण |



४८०

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | v) ५०% पेक्षा कमी वसुली | ०० गुण |
| ७ | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत बक्षीस मिळाले असल्यास. | ५ गुण | i) विभाग किंवा राज्य स्तरावरील बक्षिस मिळाले असल्यास.<br>ii) जिल्हा स्तरावरील बक्षिस मिळाले असल्यास<br>iii) पंचायत समिती स्तरावरील बक्षिस मिळाले असल्यास.<br>iv) जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील प्रथम तीन पैकी क्रमांक मिळाला असल्यास.<br>v) कोणतेही बक्षिस किंवा प्राधान्य क्रमांक नाही. | ०५ गुण<br>०४ गुण<br>०३ गुण<br>०१ गुण<br>०० गुण |
| ८ | भूजल कायदा व पाणी वाटपाबाबत गाव सहभाग. | १० गुण | i) गावाने स्वयंनियोजन करुन त्याप्रमाणे कार्यवाही केली असल्यास (शिवकालिन योजनेप्रमाणे).<br>ii) शिवकालीन योजनेप्रमाणे केवळ नियोजन केले असल्यास.<br>iii) अंमलबजावणी/ नियोजन केले नसलेले | १० गुण<br>०५ गुण<br>०० गुण |

टीपः गावाने शासनाने ठरविलेल्या किमान दराने किंवा त्या दरापेक्षा जास्त दराने पाणीपट्टी आकारलेली असावी. तरच अ.क्र. ६ च्या निकषाखाली द्यावयाचे गुण प्राप्त होतील.

९) वरील निकषाप्रमाणे गुण देऊन **सर्वांत जास्त गुण मिळणाऱ्या अर्जदार ग्रामपंचायतीची प्राथम्य यादी** तयार करण्यात येईल. (सर्वात जास्त गुण प्राप्त ग्रामपंचायत सर्वात प्रथम व नंतर गुणांच्या उतरत्या क्रमांने यादी तयार करावी.) प्रस्तावनेतील क्र. २ येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार जिल्हा परिषदेकडे प्राप्त प्रस्तावांचे ठेवण्यात आलेल्या नोंदणी रजिस्टरमध्ये त्याची नोंद घेण्यात यावी. त्या वर्षात उपलब्ध होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने, पूर्वीच्या वर्षातील सर्व सुरु कामांना त्या वर्षात आवश्यक निधी विचारात घेऊन, यापैकी प्राथम्य क्रमाने जी गावे **१०% लोकवर्गणी देण्याचे व १००% देखभाल दुरुस्ती खर्च करण्याचे ठराव,** तसेच शासकीय निर्णय दिनांक ३ सप्टेंबर २००१ नुसार इतर ठराव करण्याचा निर्णय घेतील त्यांच्या योजना मंजूर कराव्यात. **वर्षातील या योजनांचा अग्रक्रम मंजूर करण्याचा निर्णयमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या शिफारशीनुसार जिल्हा परिषदेतील पाणीपुरवठा व जलसंधारण समितीने घ्यावा. समितीला शासनाने ठरवून दिलेल्या निकषास कोणतीही सूट देऊन योजनां प्राधान्यक्रम मंजूर करता येणार नाही.** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शासनाच्या निकषानुसार प्राधान्य यादी तयार केली आहे याची पडताळणी करुन उपलब्ध निधीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतींचा/ गावांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याची बाब केवळ ही संमिती हाताळेल. योजनाच्या तात्रिक, प्रशासकीय मंजुरीसाठी व अंमलबजावणीसाठी क्र. २ येथे नमूद शासन आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी:-



४८९

अ) प्राधान्य यादीत नाव आल्यावर ग्रामपंचायतीने/ गावाने **प्राकलने व आराखडे** (Plans & Estimates) तयार करण्यासाठी ग्रामसभेत ठराव करुन त्यांच्या मतानुसार **भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, तांत्रिक ज्ञान असलेल्या शासन पॅनेलवरील सक्षम सेवाभावी संस्था किंवा खाजगी तंत्रज्ञ अथवा गावातील सक्षम तंत्रज्ञ** यांच्याकडून ते तयार करुन घ्यावेत **व खर्च प्रथम ग्रामपंचायतीने/ गावाने करावा.**

ब) जिल्हा परिषदेअंतर्गत संबंधित यंत्रणेने या Plan Estimate ला जी मंजुरी दिली असेल (दुरुस्तीसह अथवा त्याशिवाय) त्या **मंजुरीच्या कमाल २% च्या अधीन राहून** जो प्रत्यक्ष खर्च प्राकलने व आराखडे तयार करण्यासाठी ग्रामपंचायतीने/ गावाने केला असेल त्या खर्चाची १००% प्रतिपूर्ती ग्रामपंचायतीने/ गावाने उघडलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या स्वतंत्र खात्यात जिल्हा परिषदेमार्फत वर्ग करण्यात यावी. वरील यंत्रणेपैकी जी यंत्रणा किमान दराने काम करेल व कामाची गुणवत्ता राखेल त्यांनाच ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने हे काम द्यावे. २% पेक्षाचा जादा खर्च ग्रामपंचायतीला/ गावाला करावा लागेल.

१०) प्राकलन व आराखडे (Plans Estimates) जिल्हा परिषदेकडे सादर करताना गावाने पुढीलप्रमाणे इतर निर्णय/ ठराव सोबत सादर करावेत:-

अ) गावच्या योजनेच्या सर्व बाबींचा **हिशेब ठेवण्यासाठी** गाव कोणास नेमणार आहे, त्याची अर्हता काय आहे, हे नमूद असावे. (शक्यतो गावाने ग्रामसभेत गाव स्तरावरील स्वयंसेवी काम करण्यास इच्छुक लाभधारकांपैकी एकाची निवड करावी. शिक्षण किमान एस.एस.सी झालेले असावे. पाणीपुरवठा व स्वच्छता समितीवर नेमलेल्या पात्र सदस्यांपैकी, शक्यतो महिलेला या कामासाठी प्राधान्य देण्यात यावे. यासाठी येणारा खर्च गावाला देखभाल, दुरुस्ती निधीतून करावा लागाणार आहे याची गावाने नोंद घेऊन ग्रामसभेची सहमती घ्यावी.)

ब) योजनेचे **तांत्रिक पर्यवेक्षण** (Technical Supervision,i.e., Project Management). गाव कोणाला सोपविणार आहे. (भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जिल्हा परिषद, तांत्रिक ज्ञान असलेल्या अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO), खाजगी तंत्रज्ञ इत्यादी ) याबद्दल नमूद असावे. तसेच ही निवड पारदर्शी पध्दतीने कशी करण्यात येईल हेही नमूद असावे.

क) १०% लोकसहभागापैकी **रोख स्वरुपात** किती रक्कम गाव जमा करणार आहे याबद्दल स्पष्ट तरतूद असावी. (ही रक्कम )

फ) योजनेस आवश्यक **माल घेण्यासाठी** किंवा सेवा उपलब्ध करु घेण्यासाठी जिल्हा परिषद अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडील कंत्राटदारांची यादी गाव वापरणार नसेल तर त्यापेक्षा स्वस्त व चांगली सेवा/ माल उपलब्ध होण्यासाठी गाव अंमलात आणणार असलेल्या पध्दतीची (जसे जाहिर निविदा मागवून किंवा तीन कोटेशन मागवून इ.) माहिती नमूद असावी.

११) **तांत्रिक पर्यवेक्षणचा अनुज्ञेय खर्च:-** प्राकलने व आराखडयाप्रमाणे (Plans Estimates) मंजूर प्रकल्प खर्च किंवा योजनेवर अंतिम रीत्या झालेला एकूण खर्च यापैकी जी रक्कम कमी असेल त्या **खर्चाच्या ५% पर्यंत खर्च तांत्रिक पर्यवेक्षण क्षुल्क** म्हणून गावास विहित पध्दतीने नेमलेल्या तांत्रिक पर्यवेक्षकाला अदा करता येईल. मात्र यासाठी पारदर्शी पध्दतीने ग्रामसभेत ठराव करुन नेमणूक झालेली असावी. मंजूर प्राकलने व आराखडयात या खर्चाचा समावेश करुन एकूण मंजुरीच्या ५% रक्कम कमाल खर्चाचे अधीन खर्च करता येईल. त्यापेक्षा जादा खर्च केल्यास तो संबंधित गावास उचलावा



४८२

लागेल. ही रक्कम योजनेच्या भौतिक कामाच्या टप्प्यांसाठी ज्याप्रमाणे व ज्यावेळी निधी देण्यात येईल त्याचवेळी यासाठीसुध्दा गावास जिल्हा परिषदेकडून वितरीत करण्यात यावी.

१२) गावाने नेमलेल्या हिशोबनिसाला (Accountant) तसेच इतरांना घ्यावयाची आवश्यक प्रशिक्षणे, गावाला बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी पूर्ण करावी लागतील. प्रशिक्षणासाठी आवश्यक खर्च जिल्हा परिषदेने करावा. पाणीपुरवठा विभागाच्या नाशिक प्रशिक्षण केंद्रामार्फत जिल्हा परिषदांनी हे प्रशिक्षण दिल्यास प्रशिक्षणाचा खर्च नाशिक प्रशिक्षण केंद्र करेल.

१३) गावाला **निधी उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे टप्पे असतील:-**

**अ)** ग्रामपंचायतीने/ गावाने प्राकलने व आराखडे (Plans and Estimates) तयार करण्यासाठी मंजूर प्राकलने व आराखडयाच्या (Plans and Estimates) रकमेच्या कमाल २% पर्यंतच्या खर्चाच्या अधीन राहून निधी अनुज्ञेय राहिल. ही रक्कम ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीला जिल्हा परिषदेच्या पर्यवेक्षक तांत्रिक अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी न घेता खात्यातून चेकव्दारे, हे काम करणाऱ्या/ केलेल्या यंत्रणेला वितरीत करता येईल.

ब) **प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्लागार शुल्क:-** मंजूर प्राकलने व आराखडे (Plans and Estimates) व दिलेली कंत्राटे यांच्या अधीन राहून प्रत्यक्ष खर्चाच्या ५% पर्यंत निधी करारात ठरल्यानुसार टप्प्याटप्प्याने संबंधित तांत्रिक सल्लागाराला पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने, सेवेची प्रत पाहून वितरीत करावा.

क) शासन सहभागाचा ९०% निधी खालीलप्रमाणे देण्यात येईल:-

i) लोकसहभागामधून गावानी ठरविलेल्या रोखीने जमा करावयाच्या रकमेपैकी किमान ४% निधी (२% प्लॅन इस्टीमेटसाठी व किमान २% कामासाठी) ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समितीने स्वत:चे खात्यात रोख जमा केल्यानंतर मंजूर प्राकलने व आराखडयांच्या २०% निधी जिल्हा परिषदेकडून गावाच्या खात्यात जमा करण्यात येईल. यामधून कंत्राटदाराला करारानुसार द्यावयाचा **Mobilization Advance, सुरुवातीची आवश्यक माल खरेदी, हिशेबाची पुस्तके खरेदी, टेंडरचा खर्च, विमा खर्च, प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्लागार खर्च,** सुरुवातीला लागणारी आवश्यक मजुरीची कामे व उर्वरित शक्य तेवढी कामे यातून करावी.

ii) ही **२०%** रक्कम आणि त्याचबरोबर जमा केलेली लोकसहभागाची रोख रक्कम यातून किमान ९०% पूर्ण खर्च करुन त्या खर्चाचे विवरण (Statement) ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीने या प्रकल्पासाठी जिल्हा परिषदेने नेमलेल्या तांत्रिक पर्यवेक्षण अधिकाऱ्यामार्फत त्यांच्या Counter सहीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केल्यानंतर पुढील ४०% रक्कम ८ दिवसांचे आत गावाच्या खात्यात जमा करण्यात येईल. यासाठी आणखी कोणतेही लेखा परीक्षण किंवा अतिरिक्त कागदपत्रांची गरज राहणार नाही.

iii) त्यापुढील **२५%** रक्कम वरील (i) (ii) मध्ये नमूद लोकसहभाग व शासन सहभागाच्या रकमेसहित एकूण रकमेच्या ९०% खर्चाचे विवरण जिल्हा परिषदेने नेमलेल्या लेखा परीक्षकाकडून लेखा परीक्षण झाल्यानंतर आणि जिल्हा परिषदेने नेमलेल्या तांत्रिक पर्यवेक्षण अधिकाऱ्यांचा परीक्षण अहवाल प्राप्त झाल्यावर व गावाने ठरविलेली उर्वरित लोकसहभागची रोख रक्कम जमा केलेली आहे व ठरल्याप्रमाणे श्रमदानाचे काम १००% पूर्ण केलेले आहे. किंवा जिल्हा परिषदेने शासनाच्या वतीने तोपर्यंत दिलेल्या एकूण रकमेत जे काम पूर्ण केलेले आहे त्या कामात अपेक्षित असलेला सर्व लोकसहभागाचा भाग पूर्ण केलेला आहे (रोख व श्रमदान किंवा



८८३

वस्तूदान ) याची खात्री झाल्यावर जिल्हा परिषदेकडून गावाच्या संबंधित खात्यात उपलब्ध करुन देण्यात यावी.

ड) एकूण झालेला सर्व खर्च निश्चित केल्यानंतर, महिला मंडळाचे कामाबाबतचे ना-हरकत पत्र प्राप्त झाल्यानंतर, गावात नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराचा अंतिम दाखला प्राप्त झाल्यानंतर व जिल्हा परिषदेच्या तांत्रिक पर्यवेक्षकाने अंतिम अहवाल दिल्यानंतर एकूण प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या अधीन राहून उर्वरित ५% रक्कम गावाला जिल्हा परिषदेकडून ८ दिवसांत उपलब्ध करुन दिली जाईल ५% पेक्षा जादा निधी लागल्यास तो गावाला खर्च करावा लागेल. (सुलभ संदर्भासाठी वरील निधीच्या वितरणाची एकत्रीत माहिती सोबतच्या जोडपत्रात देण्यात आली आहे.)

२. वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. या मार्गदर्शक सूचनांबाबत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्या अडचणींचे निराकरण करण्याचे अधिकार शासनास असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(बी. सी. खटुआ)**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्य मंत्री यांचे सचिव
मा. उप मुख्य मंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
विभागीय आयुक्त सर्व
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव (प्रशासन), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणीपुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकारण (सर्व)
सर्व तहसीलदार
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)



४८४

गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल. महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नवी मुंबई
मुख्य लेखा परिक्षक. स्थानिक निधी लेखा. नाशिक. पुणे. औरंगाबाद. अमरावती व नागपूर
नियोजन विभाग. मंत्रालय. मुंबई.
वित्त विभाग. मंत्रालय. मुंबई
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालयातील सर्व विभाग
पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.



४८५

## जोडपत्र

## शासन परिपत्रक क्र. ग्रापापु. १००२/ प्र. क्र ५३२/ पापु, ०७ दि. २३ मार्च २००२ चे जोडपत्र

| अ.क्र | टप्पा | लोकसहभाग (किमान १०%) | | शासन सहभाग (कमाल ९०%) | | कामाचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रोख (पा.पु. व स्व.योजनेच्या खात्यात) (३) (अ) | वस्तूदान/श्रमदान/ कौशल्य दान (प्रत्यक्ष योजनेला) आवश्यक (३) (ब) | उपलब्धता (४) (अ) | अटी (४) (ब) | (५) | (६) |
| १ | प्राकलने व आराखडे तयार करणे. | किमान २% (सादर केलेल्या मंजूर प्राकलन रकमेच्या). | गावस्तरावरील तज्ञांचे कौशल्य दान. | ---- | प्राकलने व आराखडे मंजुरीला सादर करताना त्याच्या २% रक्कम जमा करुन ती तयार करणाऱ्यास अदा केल्याचा पुरावा अथवा २% जमा रकमेचे बँकेचे प्रमाणपत्र सादर करणे. | ग्रामसभेने ठरविलेल्या योजनेचे सर्वेक्षण करुन मंजुरीस्तव सादर करण्यासाठीचे शुल्क. | ग्रामसभेने प्रथम ही रक्कम लोक सहभागातून जमा करुन प्राकलने व आराखडे करणाऱ्याला अदा करावी. ही रक्कम जि.प. कडून मंजूर प्राकलने आराखडयाच्या रकमेच्या २% पेक्षा जादा नसावी. त्यापेक्षा जादा रक्कम गावाला जादा लोकसहभाग जमा करुन अदा करावी लागेल. |
| २ | जि.प. च्या योजना मंजुरीनंतर, तसे गावाला कळविल्यानंतर त्वरित | किमान २% (मंजूर प्राकलन रकमेच्या). | मंजूर योजनेत गावाने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जादा. | २०% (मंजूर प्राकलन रकमेच्या). | योजना मंजुरीनंतर गावाने मंजूर प्राकलनाच्या २% रक्कम रोख जमा केल्याचे बँकेचे प्रमाणपत्र सादर केल्यावर ८ दिवसांत. | गावाने जमा केलेल्या रोख रकमेतून व शासन सहभागातून उपलब्ध रकमेतून टेंडर देणे, खर्च हिशोबाची रजिस्टर्स खरेदी आदीची रक्कम, विमा, प्रकल्प व्यवस्थापक तथा तांत्रिक सल्लागाराच्या शुल्काचा प्रथम हप्ता, मंजुरी, योजनेसाठी ग्रामसभेने ठरविल्याप्रमाणे कंत्राटदारास Mobilization Advance व रकमेतून शक्य तेवढे कामाचे running bill देण्यासाठी खर्च करता येईल. | एकूण उपलब्ध रोख रकमेच्या (लोक सहभाग + शासन सहभाग) किमान ९०% खर्च झाल्याचे तांत्रिक सल्लागाराचे प्रमाणपत्र जि.प. ने नेमलेल्या तांत्रिक पर्यवेक्षकाचे प्रतिस्वाक्षरीने जि.प. कडे प्राप्त झाल्यावर टप्पा ३ मधील हप्त्याची रक्कम गावाचे बँक खात्यात ८ दिवसांत जमा करणेत येईल. |

४२८

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | योजना काम सुरु असताना. | किमान १% (मंजूर प्राकलन रकमेच्या). | मंजूर योजनेत गावाने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जादा. | ४०% (मंजूर प्राकलन रकमेच्या). | शेरा क्रमांक २ प्रमाणे पूर्तता झाल्यावर. | तांत्रिक सल्लागाराचा ठरलेला हप्ता (कामाचे टप्प्यानुसार), पुढील कामे, सामुग्री खरेदी (विहित पध्दतीने), मंजुरी. | एकूण टप्पा (२) व (३) मधील उपलब्ध झालेला लोक सहभाग + शासन सहभाग रकमेच्या किमान ९०% खर्च झाल्यानंतर तांत्रिक सल्लागाराचे प्रमाणपत्र, बिले लेखा परीक्षकाने तपासल्यानंतर व जि.प. च्या तांत्रिक पर्यवेक्षक अधिकाऱ्याने प्रतिस्वाक्षरीने जि.प. कडे सादर केल्यानंतर ८ दिवसांत पुढील हप्ता अदा होईल. |
| ४ | योजना काम सुरु असताना. | ग्रामसभेने ठरविल्याप्रमाणे उर्वरित संपूर्ण रोख भाग. | मंजूर योजनेत गावाने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जादा. | २५% (मंजूर प्राकलन रकमेच्या). | | | एकूण टप्पा २,३ व ४ मधील उपलब्ध लोकसहभाग +शासन रकमेच्या १००% खर्च झाल्यानंतर, तांत्रिक सल्लागाराचे प्रमाणपत्र तांत्रिक पर्यवेशकाचे प्रतिस्वाक्षरीने जि.प. कडे सादर झाल्यावर ८ दिवसांत प्रत्यक्ष झालेल्या एकूण खर्चाच्या अधीन, उर्वरित ५% रक्कम अदा करावी. |
| ५ | योजनेचे काम पूर्ण झाल्यावर | ------ | मंजूर योजनेत गावाने ठरविल्याप्रमाणे आवश्यक तेवढे वा त्यापेक्षा जादा. | ५% (मंजूर प्राकलन रकमेच्या). | प्रत्यक्ष एकूण खर्चाचा विचार करुन ५% पर्यंत रक्कम अदा करणेत येईल. शासनाचा सहभाग एकूण प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% पेक्षा जास्त असणार नाही पूर्वीचीच रक्कम शिल्लक राहिल्यास ती परत करावी लागेल. ५% पेक्षा जादा खर्च गावाने लोकवर्गणीतून जादा रोख रक्कम जमा करुन करावा लागेल. | काम पूर्ण झाले असावे, सर्व हिशोब पूर्ण केले असावेत,लेखा परीक्षण झाले असावे, योजना कायान्वित झाली असावी. | |

टीप:- १)योजनेची प्राकलने व आराखडे तयार करताना त्यात प्रत्यक्ष कामावरील खर्चाशिवाय २% प्राकलने व आराखडे खर्च आणि ५% प्रकल्प व्यवस्थापन व तांत्रिक सल्ला खर्च अंतर्भूत असेल.